महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १७३ वा | दिनांक : १२/०४/२०२५ | वार : शनिवार

## एम.आय.एम. चे इम्तियाज जलील 'मातोश्री'वर : उद्धव ठाकरे यांची घेतली भेट



**मुंबई :** एमआयएमचे नेते तथा छत्रपती संभाजीनगरचे माजी खासदार इम्तियाज जलील यांनी आज अचानक मातोश्रीवर जाऊन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. यावेळी दोन्ही नेत्यांत बराच वेळ चर्चा झाली. या चर्चेचा तपशील समजला नाही. पण यामुळे राजकीय वर्तुळात वेगवेगळ्या अटकळी व्यक्त केल्या जात आहेत. दरम्यान, ठाकरे गटाचे नेते तथा विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी जलील आपल्या मुलाच्या लग्नाचे निमंत्रण देण्यासाठी ठाकरेंकडे गेले असतील, असा अंदाज वर्तवला आहे.

अंबादास दानवे यांनी काही दिवसांपूर्वी ईदच्या निमित्ताने इम्तियाज जलाली यांच्या छत्रपती संभाजीनगर येथील निवासस्थानी भेट दिली होती. त्यावेळी त्यांनी ईदच्या शुभेच्छा देण्याशिवाय या भेटीत काहीही नवीन नसल्याचा दावा केला होता. जलील यांनी यावेळी आपली बाजू स्पष्ट केली होती. मी दरवर्षी अंबादास दानवे यांना दिवाळीच्या शुभेच्छा देण्यासाठी त्यांच्या घरी जातो. ते ही ईदच्या निमित्ताने माझ्या घरी येतात. आमच्यात राजकीय मतभेद आहेत म्हणून आम्ही एकमेकांचे शत्रू आहोत असे नाही. त्यामुळे या भेटीचा कोणताही राजकीय अर्थ काढू नका, असे ते म्हणाले होते. या पार्श्वभूमीवर इम्तियाज जलील यांनी उद्धव ठाकरे यांची भेट घेतली आहे.

इम्तियाज जलील आज दुपारी मातोश्री या ठाकरे कुटुंबाच्या निवासस्थानी पोहोचले. तिथे त्यांनी उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. यावेळी या दोन्ही नेत्यांत बराच वेळ चर्चा झाली. या चर्चेचा तपशील बाहेर आला नाही. त्यामुळे या भेटीचे कारण काय? उभय नेत्यांत काही राजकीय चर्चा झाली का? इम्तियात जलील ठाकरे गटाशी जवळीक साधण्याचा प्रयत्न करत आहेत का? अशा वेगवेगळ्या चर्चा राजकीय वर्तुळात रंगल्या आहेत.

दुसरीकडे, अंबादास दानवे यांनी इम्तियाज जलील यांच्या मातोश्री भेटीमागे कोणतेही राजकारण नसल्याचा दावा केला आहे. इम्तियाज जलील यांच्या मुलाचे लग्न आहे. या लग्नाची पत्रिका देण्यासाठी ते मातोश्रीवर गेले असण्याची शक्यता आहे. आदित्य ठाकरे व इम्तियाज जलील यांच्या मुलाचीही थोडीफार ओळख आहे. त्यामुळे जलील लग्नपत्रिका देण्यासाठी मातोश्रीवर गेले असतील, असे दानवे म्हणाले.

उल्लेखनीय बाब म्हणजे इम्तियाज जलील यांनी नुकतीच खुलताबादचे नामांतर रत्नपूर असे करण्याच्या मुद्यावरून शिंदे गटाचे नेते तथा कॅबिनेट मंत्री संजय शिरसाट यांच्यावर टीका केली होती. तुम्ही शहरांची, इमारतींची व रस्त्यांची नावे बदलत आहात. आता नावे बदलण्याची मालिका सुरूच झाली असेल, तर तुम्ही तुमच्या बापाचेही नाव बदलून घ्या. आता अजून राहिले तरी काय? सांगून टाका की, आम्हाला हे नाव आवडले नव्हते, त्यामुळे आम्ही ते बदलले, असे ते म्हणाले होते. त्यांच्या या टीकेचा संजय शिरसाट यांनी खरपूस समाचार घेतला होता.

## उद्धव ठाकरे सिंधुदुर्गमध्ये आल्यावर मासे बंद ठेवा : नारायण राणेंची ठाकरेंवर टीका



**सिंधुदुर्ग :** उद्धव ठाकरे सिंधुदुर्ग जिल्ह्यात येणार एव्हा हॉटेलमध्ये कोंबडी, वडे, मासे बंद ठेवायचे, असे आदेश भाजप नेते व खासदार नारायण राणे यांनी हॉटेल व्यावसायिकांना दिले आहेत. मुख्यमंत्री असताना उद्धव ठाकरेंनी कोकणाला काय दिले? केवळ मासे, मटण खाण्यासाठी कोकणात येतो, अशी टीका राणे यांनी उद्धव ठाकरेंवर केली आहे.

खासदार नारायण राणे उद्धव ठाकरे यांच्यावर टीका करताना म्हणाले, मुख्यमंत्री असताना उद्धव ठाकरे यांनी कोकणाला काय दिले? केवळ मासे मटण खाण्यासाठी कोकणात येतो. त्यामुळेच तो आला की हॉटेलमध्ये कोंबडी, वडे, मासे बंद ठेवायचे असे मी हॉटेल व्यावसायिकांना सांगितले आहे, असे नारायण राणे म्हणाले.

पुढे बोलताना नारायण राणे म्हणाले, उद्धव ठाकरे अडीच वर्षे मुख्यमंत्री असताना कोकणाला काही दील नाही. अडीच वर्षात त्यांनी दिलेल्या पैशांची आकडेवारी जरा पहा. त्यांनी सिंधुदुर्ग जिल्ह्याला किती पैसे दिले? त्यांना कोकणावर बोलायचा काहीही अधिकार नाही. कोकणात येण्याचाही त्यांना अधिकार नाही, असेही नारायण राणे म्हणाले आहेत.

चिपी विमानतळाविषयी बोलताना नारायण राणे म्हणाले, चिपी विमानतळावरुन आता इंडिगो विमान पण येणार आहे. आता चिपी विमानतळ बंद होणार नाही. सिंधुदुर्ग जिल्ह्यातून विमान देशात वेगवेगळ्या ठिकाणी जाईल, यासाठी माझा प्रयत्न आहे. लोकांनी प्रवास करावा, उद्योगधंदे वाढवावेत यासाठी माझा प्रयत्न आहे. तसेच मालवण येथील राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराज यांचा नव्याने पुतळा उभारण्यात येणाऱ्या ६० फूट उंचीचे पुतळ्याचे १ मे रोजी अनावरण होणार असल्याची माहितीही नारायण राणे यांनी दिली आहे.

## एसटी कर्मचाऱ्यांचा पगार दर महिन्याच्या ७ तारखेला : परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची घोषणा



**मुंबई :** यापुढे एसटी कर्मचाऱ्यांचा पगार दर महिन्याच्या ७ तारखेला होईल, याची जबाबदारी एसटी महामंडळाचे अध्यक्ष म्हणून माझी असेल, असे आश्वासन परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी सर्व कर्मचाऱ्यांना दिले. ते एसटी मुख्यालयात महामंडळाच्या अध्यक्षपदाचा कार्यभार स्वीकारताना बोलत होते. यावेळी एसटी महामंडळाच्या संचालक मंडळाचे सदस्य व परिवहन आयुक्त विवेक भीमनराव, एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर व सर्व खाते प्रमुख उपस्थिती होते.

प्रताप सरनाईक म्हणाले, आर्थिक अडचणीमुळे एसटीत काम करणाऱ्या ८३ हजार कर्मचाऱ्यांना मार्च महिन्याचे वेतन केवळ ५६ टक्के देता आले, हे अत्यंत दुर्दैवी आहे. यापुढे महिनाभर कष्ट करणाऱ्या एसटी कर्मचाऱ्याचा पगार दरमहा ७ तारखेला त्यांच्या बॅक खात्यांत जमा करण्यात येईल. त्यासाठी राजशिष्टाचार सोडून महामंडळाचे अध्यक्ष म्हणून मी स्वतः अर्थ खात्याच्या अधिकाऱ्यांना भेटून विनंती करेन. परंतु आर्थिक अडचणीमुळे कर्मचाऱ्यांचे वेतन कधीही रखडणार नाही याची जबाबदारी मी घेईन, असे आश्वासन मंत्री सरनाईक यांनी एसटी कर्मचाऱ्यांना दिले.

यावेळी माध्यमांशी बोलताना मंत्री सरनाईक म्हणाले, एसटी महामंडळाच्या अध्यक्षपदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर राज्यातील १३ कोटी जनतेला सुरक्षितता आणि किफायतशीर परिवहन सेवा देणारी एसटी ही महाराष्ट्राची "लोकवाहीनी" आहे. भविष्यात एसटी आर्थिकदृष्ट्या सक्षम करून प्रवासी जनतेला दर्जेदार दळणवळण सेवा देण्यासाठी मी प्रयत्नशील राहीन. अर्थात, यासाठी एसटीच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे सकारात्मक सहकार्य अपेक्षित आहे. त्यांच्या सहकार्याबरोबर शासन म्हणून सन्माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे मार्गदर्शन देखील लाभाणार आहे.

यापुढे एसटीला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याबरोबरच परिवहन सेवा प्रवासीभिमुख व दर्जेदार करण्यासाठी काही चांगले निर्णय देखील आम्ही घेणार आहोत. त्यामध्ये सर्व बसस्थानकावरील प्रसाधनगृहे ही अत्याधुनिक पद्धतीची स्वच्छ व निर्जंतुक असतील. प्रवाशांच्या सुरक्षेसाठी विशेषतः महिला प्रवाशांच्या सुरक्षेसाठी प्रत्येक बसस्थानकावर व नवीन येणाऱ्या बसेसमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे, पॅनिक बटन, सुरक्षा रक्षकांची संख्या वाढवणे, यावर भर देणार आहोत, असेही सरनाईक म्हणाले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ११ एप्रिल २०२५


## कस्तुरी कुलकर्णी - जोशी जिल्ह्यात पहिल्या आठ मध्ये




**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र शासन शिक्षण विभाग जिल्हा परिषद छत्रपती संभाजी नगर, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, ॲमेझॉन फ्युचर इंजिनिअरिंग व लीडरशिप फॉर इक्विटी (LFE) ह्यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विज्ञान तंत्रज्ञान शिक्षक प्रशिक्षण स्पर्धेत जि. प. प्रा. शा. गारज, केंद्र बाभुळगाव, ता. वैजापूर येथील उपक्रमशील तथा तंत्रस्नेही शिक्षिका सौ. कस्तुरी कुलकर्णी - जोशी यांनी जिल्ह्यातून 8 वा क्रमांक पटकावला आहे. याबद्दल जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेत प्राथमिक शिक्षणाधिकारी जयश्री चव्हाण मॅडम, संचालिका राठोड मॅडम, प्राचार्या सानवी देशमुख मॅडम, विभाग प्रमुख श्री प्रकाश मांटे सर यांच्या हस्ते सौ.कस्तुरी कुलकर्णी - जोशी यांचा सोमवारी लॅपटॉप व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. या यशाबद्दल शिक्षण विभागातील अधिकारी, शिक्षक, गावकरी मंडळींनी अभिनंदन केले आहे.

## श्री महात्मा बसवेश्वर नागरी सहकारी पतसंस्थेला यंदा २९ लाख ९३ हजार रुपयाचा नफा




**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** येथील श्री महात्मा बसवेश्वर नागरी सहकारी पतसंस्था म. मुरुम येथील बसव सहकार भवन या इमारतीत सोमवारी (ता. ७) दुपारी ४ वाजता पतसंस्थेचे चेअरमन शिवशरण वरनाळे यांच्या अध्यक्षतेखाली संचालक मंडळाची बैठक पार पडली. ३१ मार्च २०२५ च्या तेरीज पत्रक नफातोटा, ताळेबंध या आर्थिक पत्रकावर चर्चा करण्यात आली. . पतसंस्थेचे यंदाचे १५ वे वर्ष असून यंदाच्या आर्थिक वर्षात पतसंस्थेस २९ लाख ९३ हजार ८२८ रुपयाचा निव्वळ नफा झाला आहे. या पतसंस्थेकडे यंदा १३ कोटी ४० लाख ७२ हजार ९४९ रुपयाच्या ठेवी आहेत. संस्थेने यंदाच्या आर्थिक वर्षात १० कोटी ९९ लाख ४९ हजार १३३ रुपयाचे कर्ज वाटप केले आहे. संस्थेची इतर बँकेत गुंतवणूक ४ कोटी ८३ लाख ८२ हजार २४२ रुपये. सदर आर्थिक वर्षात १८ कोटी ३२ लाख २५ हजार ५३२ रुपये उलाढाल झाली आहे. या पतसंस्थेचे मार्च अखेर ४१८२ सभासद आहेत. संस्थेच्या स्थापनेपासूनच ऑडिट वर्ग 'अ ' दर्जा प्राप्त असून संपूर्ण संगणकीकृत आहे. सध्या पतसंस्थेची वाटचाल शासकीय धोरणानुसार कॅशलेस व्यवहाराकडे चालू आहे. सात वर्षापासून आर. टी. जी. एस. / एन. एफ. टी. ची सुविधा चालू असून मोबाईल बँकिंगचा सभासद लाभ घेत आहेत. व्यवहार करताक्षणी एस.एम.एस.सभासदाना प्राप्त होतो. ठेवीच्या अनेक योजना असून यात महालक्ष्मी लखपती योजना, गणेश युवा मंगल योजना, स्वप्नपुर्ती योजना, सरस्वती मासिक प्राप्ती ठेव योजना, स्वामी विवेकानंद ठेव योजना, डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम शिक्षण ठेव योजना, सीता स्वयंवर ठेव योजना, महात्मा बसवेश्वर लखपती ठेव योजना आदी चालू आहेत. महावितरण कंपनीचे वीज बील भरणा केंद्र, ११ टक्के सोने तारण कर्ज तर ११.५० टक्के वेअर हाऊस तारण, १३ टक्के गहाण कर्ज, १४ टक्के सामान्य कर्ज आदी सोयी ग्राहकांच्या फायद्यासाठी संस्थेकडून पुरविल्या जातात. संस्थेकडे स्वत:ची स्वतंत्र लाॅकर उपलब्ध करुन दिले आहे. टाटा कं. चे सोलार कार्यान्वित केले आहे. या बैठकीत पतसंस्थेचे उपाध्यक्ष शरणप्पा मुदकण्णा, सचिव कमलाकर जाधव, संचालक अशोक जाधव, अमृत वरनाळे, मनिष मुदकण्णा, श्रीशैल बिराजदार, मनोज बोंदर, इंद्रजित लोखंडे, श्रीशैल मायाचारी, सौ. मनिषा पवार सौ. कलावती बिराजदार, शाखाधिकारी दत्तात्रय कांबळे, कॅशिअर चिदानंद स्वामी, धीरज मुदकण्णा, प्रशांत काशेट्टे, सचिन कटेकूरे, सौ नेहा शेवाळकर पिग्मी एजन्ट संतोष मुदकण्णा, महातंय्या स्वामी, गुंडेराव गुरव आदींसह कर्मचारीवृंद व सभासद यांच्या सहकार्याने पतसंस्था यशस्वीरित्या वाटचाल करीत आहे. यंदा ठेवीमध्ये वाढ, थकीत कर्जदारांवर कडक कार्यवाही करून वसुली करण्यात येत असून यंदाचा सोळावा वर्धापन दिन १२ मे रोजी होणार असल्याचे चेअरमन शिवशरण वरनाळे यांनी माहिती दिली.

## सम्राट अशोक गृहनिर्माण हाउसिंग सोसायटीची डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती कार्यकारणी जाहीर

**छत्रपती संभाजीनगर :** सम्राट अशोक सहकारी गृहनिर्माण हाउसिंग सोसायटी पेठे नगर छत्रपती संभाजी नगर येथील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती ची कार्यकारणी जाहीर करण्यात आली. या कार्यकारणी मध्ये अध्यक्ष म्हणून प्रा. स्वप्निल साबळे उपाध्यक्षपदी इंजि. अभिजीत गायकवाड, सचिव, संकेत साबळे यांची निवड करण्यात आली, कार्याध्यक्षपदी महेंद्र जाधव, कोषाध्यक्ष अभय डोंगरे, सहसचिव अलंकार धबडगे आमची निवड करण्यात आली तर सदस्य म्हणून रोहित बागुल यश साबळे, आर्यन गायकवाड, जगदीश साबळे, सुमित जाधव, उत्कर्ष काळे यांची कार्यकारणी जाहीर करण्यात आली तर मार्गदर्शक म्हणून प्रा. अभिमन्यू पठाडे, प्रा. डॉ. युवराज धबडगे, संघपाल गायकवाड, पवन साळवे, प्रा. राहुल खंदारे, यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. जयंतीच्या निमित्ताने मुलांच्या व महिलांच्या विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असून दिनांक १४ एप्रिल रोजी सकाळी ११. वाजता डॉ. कोंडबा हटकर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

## बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात महात्मा जोतिबा फुले यांची जयंती साजरी



**जालना :** बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात महात्मा जोतिबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्रा. संभाजी कांबळे म्हणाले की, महात्मा जोतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी केलेल्या अथक प्रयत्नामुळे येथील शोषित उपेक्षित बहुजन समाजाला ज्ञानाची दारे मुक्त झाली. शिक्षण हे मानवाच्या प्रगतीचे साधन आहे. माणूस शहाणा होतो. सर्व सामाजिक समस्यांच्या समूळ नष्टतेसाठी शिक्षण हे समाजाला गरजेचे आहे. शिक्षण हे माणसाला समृद्ध बनविणे. त्यासाठी महात्मा फुले यानी बहुजन समाजाला शिक्षणाकडे वळविण्याचा प्रयत्न केला. वर्तमान युगातही फुले दांपत्याचे विचार समाजाला मार्गदर्शक आहे.यावेळी प्राचार्य कविता प्राशर, डॉ. भगवानसिंग डोभाळ, डॉ. कालिदास सूर्यवंशी, डॉ. प्रवीण कोकणे, प्रा. संदीप पाटील,डॉ. प्रियदर्शन भवरे, प्रा. राजक्रांती वळसे, डॉ. उद्धव थोरवे, प्रा. शशिकांत चौधरी, प्रा. विलास भुतेकर, डॉ.ओमप्रकाश चव्हाण, डॉ. बी. बी. सले, डॉ.रवींद्र शिपी, डॉ. व्यंकटेश कोरेबोइनवाड, प्रा. माधव हेबाडे, डॉ. रवींद्र भोरे, प्रा. अभिजीत भुतेकर, मिलिंद कुलकर्णी यांच्यासह शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## खुलताबाद येथे भद्रा हनुमान जयंतीनिमित्त जय्यत तयारी

**खुलताबाद : (प्रा. योगेश रावते)** रोजी खुलताबाद येथे होणाऱ्या हनुमान जयंतीनिमित्त भाविकांची दर्शनासाठी होणारी गर्दी लक्षात घेता भद्रा मारुती संस्थान तर्फे जय्यत तयारी करण्यात आली आहे जयंतीनिमित्त दहा ते बारा लाख भाविक येण्याची शक्यता लक्षात घेऊन संस्थान तर्फे भाविकांच्या दर्शनाची नियोजनबद्ध तयारी करण्यात आलेली आहे. दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी महिला व पुरुषांची स्वतंत्र रांग, त्यासाठी अत्याधुनिक मंडपाची व्यवस्था, भाविकांसाठी आरोग्य सेवा, पार्किंग व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, बस वाहतूक व्यवस्था, भाविकांसाठी महाप्रसादाची व्यवस्था, पोलीस सुरक्षा व्यवस्था यांसह संपूर्ण मंदिर परिसर सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या निगराणीखाली असणार आहे. शनिवारी सकाळी 4:00 वाजता मंत्री महोदय श्री. अतुल सावे यांच्या हस्ते पूजा अभिषेक करण्यात येऊन त्यानंतर महाआरती होईल. हनुमान जन्मोत्सवानिमित्त श्री ढोक महाराज यांच्या श्रीराम कथेचे आयोजन करण्यात आलेले असून सांगतेच्या दिवशी सराला बेट येथील श्री रामगिरीजी महाराज यांचे काल्याचे किर्तन होईल यानंतर भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन भद्रा मारुती संस्थांचे अध्यक्ष श्री मिठ्ठ पाटील बारगळ यांनी केले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ११ एप्रिल २०२५


## आरोग्य भक्ती शक्ती चा त्रिवेणी संगम कळंकी येथील वीरहनुमान देवस्थान




**कन्नड (अरुण थोरात) :** कळंकी ता. कन्नड येथील ऐतिहासिक वीरहनुमान देवस्थान ग्राम दैवत च नाही. तर आरोग्य, भक्ती, शक्ती चे त्रिवेणी संगम असलेले मराठवाड्यातील भाविकांचे श्रध्दास्थान आहे. त्यामुळे दरवर्षी हजारो भाविक येथे दर्शनासाठी येतात.सह्याद्री पर्वताची उपरांग असलेल्या सातमाळ, अंजिठा डोंगर रांगेच्या कुशीत वसलेले एक निसर्गरम्य गाव म्हणजे कळंकी, संभाजीनगर, जळगाव, नाशिक या तीन जिल्ह्यांचा हा सीमावर्ती भाग, हा गाव परिसर म्हणजे वाकाकट साम्राज्य व पुढे यादव साम्राज्यातील विज्जलगड राज्याचा एक भाग, उत्तरेस प्राचीन पितळखोरे लेणी, पाटणादेवी, कन्हेरगड, केदारकुंड, अश्मयुगीन मद्रासीबाबा अरण्य, पश्चिमेस संत जनार्दन स्वामी प्रथम जोतीर्लींग पिनाकेश्वर, दक्षिणेस पेडकादूर्ग, पंधरा किमी. अंतरावर सुवर्णपालेश्वर, थापलालेणी असा गौरवशाली शेजार गावास लाभला आहे. उत्तरेस गौताळा अभयारण्याची रांग, पुर्व, पश्चिम, दक्षिण विस्तीर्ण जंगल, गावाचे खरे वैभव म्हणजे एकेकाळी उंच उंच बुरुजांची गढी, याच गावात प्रसिद्ध असे जागृत दक्षिणमुखी वीर हनुमान मंदिर प्रसिद्ध आहे. ही शिवनातीरा वरील हनुमंताची पुरातण भव्य मुर्ती कोणी स्थापीत केली याचे ऐतिहासिक पुरावे नसले तरी तीची स्थापना रामदास स्वामी नी केली अशी भाविकांची धारणा आहे. हे इ.स २००० पर्यंत एक छोटेखानी मंदिर होते. त्याचे धार्मिक महत्व ओळखून ग्रामस्थांनी लोकवर्गणी च्या माध्यमातून दिडशे फुट ऊंचीचे एक भव्यदिव्य असे मंदिर उभारले, मंदिर कळस अनेक देवीदेवतां च्या शिल्पांनी मढविले आहे, रामायण, महाभार, पौराणिक देवी देवतांच्या शेकडो मुर्त्या कळसात मढविल्या आहेत. तसेच सिंह, वानर आदी प्राण्यांच्या मुर्त्या प्राणीमात्रांशी असलेले नाते सांगतात, दरवाजा च्या बाजूला उभे असलेले द्वारपाल जिवंत भासतात. हनुमान मंदिर परिसरात भवानीमाता, महादेव, खंडोबा, लक्ष्मीदेवी आदिंची मंदिरे ही आहेत. मंदिराच्या पाठी मागून शिवनानदी वाहते. या नदीत पुरातन बारव होती, आता ती बुजली आहेत. पावसाळ्यात हा सबंध परिसर हिरव्या गर्द वनराई व नदी ओढ्यांच्या खळखळण्याने बहरुण जातो. येथील वीरहनुमान जागृत माणल्या जातो. येथे मांडी, गुडघी, गालफूगी चे आजार बरे होतात. अशी भाविकांची श्रध्दा आहे. त्यामुळे मराठवाडा, खान्देश, पश्चिम महाराष्ट्रातून हजारो भाविक येथे भेट देतात. हनुमान जयंती निमित्त दरवर्षी येथे पंचमी उत्सव आयोजित केल्या जातो. याची सुरुवात रामनवमीच्या पर्वा पासून होते. यात पौराणिक कथा, पात्रांचे सजिव देखावे व महती सांगणारी सोंगे काढली जातात. हनुमान जयंती च्या दिवशी मानाचे चंडिका भवानी मातेचे सोंग काढून केल्या जाते. त्यामुळे या देवस्थानाच विशेष महत्व प्राप्त झाले आहे.

## तामिळनाडूमध्ये भाजपने अण्णाद्रमुकशी युतीची घोषणा केली



**चेन्नई :** केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी शुक्रवारी चेन्नईमध्ये अण्णाद्रमुकसोबत युतीची घोषणा केली. ते म्हणाले की, 2026 मध्ये होणाऱ्या तामिळनाडू विधानसभा निवडणुका AIADMK चे प्रमुख एडाप्पाडी पलानीस्वामी यांच्या नेतृत्वाखाली लढवल्या जातील. जागांचे वाटप चर्चेनंतर ठरवले जाईल.

शहा म्हणाले की, AIADMK ची युतीबाबत कोणतीही मागणी नाही. पक्षाचे एनडीएमध्ये सामील होणे दोघांसाठीही खूप उपयुक्त आहे.

पुढील निवडणूक द्रमुक सरकारच्या भ्रष्टाचार, दलित आणि महिलांवरील अत्याचारांच्या आधारावर लढवली जाईल. लोक घोटाळ्यांबद्दल द्रमुककडून उत्तरे मागत आहेत, ते निवडणुकीत या मुद्द्यांवर मतदान करतील.

सप्टेंबर २०२३ मध्ये, तत्कालीन तामिळनाडू प्रमुख अन्नामलाई यांनी केलेल्या काही वक्तव्यांमुळे ऑल इंडिया अण्णा द्रविड मुन्नेत्र कळघम (AIADMK) एनडीएपासून वेगळे झाले होते.

पत्रकार परिषदेत एका प्रश्नाला उत्तर देताना शहा म्हणाले की, काही मुद्द्यांवर एआयएडीएमकेची वेगवेगळी भूमिका आहे. पण आपण बसून यावर चर्चा करू, गरज पडल्यास एक CMP (कॉमन मिनिमम प्रोग्राम) देखील असेल.

येथे, पक्षाच्या प्रदेशाध्यक्षाचे नावही शुक्रवारीच जाहीर झाले. तिरुनेलवेली येथील भाजप आमदार नैनर नागेंद्रन हे भाजपचे पुढील प्रदेशाध्यक्ष होऊ शकतात. त्याची अधिकृत घोषणा झालेली नाही. पण शहा यांच्या एका एक्स पोस्टनुसार, नैनार यांचे नाव सध्याचे पक्षप्रमुख के. अन्नामलाई यांनी सुचवले होते.

२०२१ मध्ये झालेल्या गेल्या विधानसभा निवडणुकीत, द्रमुकने राज्यातील एकूण २३४ जागांपैकी १३३ जागा जिंकल्या होत्या. द्रमुक आघाडीने एकूण १५९ जागा जिंकल्या. एनडीए युतीला फक्त ७५ जागा जिंकता आल्या. अण्णाद्रमुकला ६६ जागा मिळाल्या होत्या. भाजपने ४ जागा जिंकल्या होत्या. आघाडीतील इतर पक्षांना ५ जागा मिळाल्या.

एआयएडीएमकेने सलग दोन वेळा (२०११-२०२१) राज्यावर राज्य केले. विजयानंतर, एमके स्टॅलिन राज्याचे मुख्यमंत्री बनले. एडाप्पाडी के. पलानीस्वामी यांच्या नेतृत्वाखाली, एआयएडीएमकेने सोळाव्या तमिळनाडू विधानसभेत विरोधी पक्षाचे स्थान भूषवले.

सप्टेंबर २०२३ मध्ये, तामिळनाडूचे भाजप प्रदेशाध्यक्ष असलेल्या अन्नामलाई यांनी केलेल्या काही वक्तव्यांमुळे ऑल इंडिया अण्णा द्रविड मुन्नेत्र कळघम (AIADMK) NDA मधून बाहेर पडले.

२०२१ च्या विधानसभा निवडणुकाही अण्णाद्रमुक आणि भाजपने युती करून लढवल्या होत्या. यानंतर, भाजप आणि अण्णाद्रमुक यांनी २०२४ च्या लोकसभा निवडणुका वेगवेगळ्या युतीने लढवल्या, परंतु ती निवडणूकही द्रमुकने जिंकली. हे अण्णाद्रमुक आणि भाजपसाठी एक धक्का मानले जात होते.

तामिळनाडूमध्ये लोकसभेच्या एकूण ३९ जागा आहेत. सत्ताधारी द्रविड मुन्नेत्र कळघम (DMK) च्या नेतृत्वाखालील इंडिया अलायन्सने सर्व जागा जिंकल्या आहेत. द्रमुकने २२ जागा जिंकल्या आहेत, काँग्रेसने ९, सीपीआय, सीपीआय(एम) आणि व्हीसीकेने प्रत्येकी २ आणि एमडीएमके आणि आययूएमएलने प्रत्येकी एक जागा जिंकली आहे.

काँग्रेसने शेजारच्या केंद्रशासित प्रदेश पुदुच्चेरीमध्येही एक जागा जिंकली आहे. अण्णाद्रमुक आणि भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीएला त्यांचे खातेही उघडता आले नाही.

## चाळीसगावच्या मिरची बाजारात भीषण आग



**जळगाव :** जळगावच्या चाळीसगाव शहरातील मिरची बाजाराला मोठ्या प्रमाणात आग लागली आहे. आगीमुळे परिसरात मोठ्या प्रमाणावर धुराचे लोट पसरले आहेत. या बाजाराच्या बाजूलाच पेट्रोलपंप असल्याने एकच धावपळ उडाली. या आगीत बाजाराचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

अधिकची माहिती अशी की, चाळीसगाव शहरातील नागद रोडवर मिरची बाजार आहे. या मिरची बाजाराला आज दुपारी भीषण आग लागली. मिरची बाजारात मोठ्या प्रमाणात मिरची आणि इतर शेतमालाचा साठा होता. जो या आगीत जळून खाक झाला असण्याची शक्यता आहे. या आगीत कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवला जात आहे. तसेच या आगीत एक ट्रक देखील जळून खाक झाला असल्याची माहिती समोर आलीय. मात्र, आगीचे नेमके कारण अद्याप अस्पष्ट आहे.

दरम्यान आग लागलेल्या घटनाशेजारीच पेट्रोल पंप असल्याने परिसरात एकच धावपळ उडाली आहे. अग्निशामक दलाचे जवान आग विझवण्यासाठी युद्धपातळीवर काम करत सुरु आहे. सुदैवाने यात कोणतीही जिवित हानी झालेली नाही. मात्र, आगीमुळे व्यापारी आणि शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. पोलिस प्रशासन देखील घटनास्थळी दाखल झाले असून, परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी मदत करत आहे.


इरफान इनामदार
मो. 8956362639
8087880274
9405109103
E-mail : sahilcomputer05@gmail.com
साहिल
कॉम्प्युटर्स अँण्ड प्रिंटर्स
• डी.टी.पी.जॉब वर्क
• मराठी, हिंदी, इंग्रजी
• एम.फील-पी.एच.डी.,थेसिस
• स्पायरल / हार्ड बाईन्डींग
• लॅमिनेशन
• कलर प्रिंट
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ११ एप्रिल २०२५

# आता युद्ध अटळ आहे : शब्द शस्त्राने परिवर्तन घडवून आणणारा कवितासंग्रह




डॉ. शिवाजी हुसे हे साहित्यक्षेत्रामध्ये सर्जनशील आणि सर्वपरिचित व्यक्तिमत्त्व. उपक्रमशीलता हा त्यांचा गुणधर्म.अध्यापनामध्ये विविध प्रयोग राबवत असतानाच त्यांनी तिफण त्रैमासिकाची सुरुवात केली. कन्नड सारख्या दुर्गम भागातून प्रसिद्ध होणारे भाषा,साहित्य कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले हे त्रैमासिक सोळाव्या वर्षात पदार्पण करत आहे. तिफणचे आजपर्यंत अनेक महात्वाचे विशेषांक प्रसिद्ध झालले आहेत. शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,कन्नड येथे मराठी विभाग प्रमुख म्हणून कार्यरत आहेत. उपक्रमशील प्राध्यापक म्हणून त्यांनी आपला ठसा उमटविलेला आहे. महाविद्यालयामध्ये अनेक समित्यावर ते काम करतात. त्यांचे अनेक ग्रंथ प्रकाशित झाले तसेच तिफण चे १८ विशेषांकाचे संपादन केले. जवळपास सर्वच ग्रंथ दखलपात्र झलेली आहेत.

याच उपक्रमशीलतेचा परिपाक म्हणजे त्यांचा 'आता युद्ध अटळ आहे' हा कवितासंग्रह होय.भारताला स्वातंत्र्य मिळाले, गुलामगिरीच्या साखळदंडातून मुक्त होऊन आपण मोकळा श्वास घेतला.आता स्वातंत्र्याची फळे चाखता येईल वाटले. सुरुवातीचे दिवस बरे गेले. स्वातंत्र्याची फळे चाखताना हळूहळू वाईट अनुभव यायला लागले,चटके बसायला लागले.तेव्हा स्वातंत्र्याने काय दिले? असे प्रश्न पडू लागचे.परकीयांच्या जोखडातून मुक्त झालो आणि स्वकियांच्या बंधनाच्या पाशात जखडलो जाऊ लागलो.परकियांना विरोध करणे,पराजित करणे सोपे होते पण आपल्याशी लढा देणे खूप अवघड होऊन बसले. 'आपलेच दात आणि आपलेच ओठ' बोलावे तरी कुठे,पावसाने झोडपले आणि राजाने मारले तर सांगावे कोणाला' असली अवस्था होऊन बसली आणि शेवटी आपल्याच लोकांशी युद्ध करण्याची वेळ आली. फरक इतकाच आहे तेव्हाचे युद्ध शस्त्राचा वापर करून होते.आताचे युद्ध शब्दांच्या शस्त्राचे वापर करून करावे लागणारे आहे. म्हणून कवी म्हणतात 'आता युद्ध अटळ आहे'.

आताचे युद्ध आम्हाला कष्ट करून,घाम गाळून योग्य मोबदला मिळत नाही त्यासाठी, सर्वांच्या मार्गातल्या उजेडवाटा शोधण्यासाठी, आंबेडकरवादी विचारांचे बिजारोपण करण्यासाठी, सालोसाल दु:ख भोगले त्याचे समूळ उच्चारण करण्यासाठी,ज्यांचे बलिदान गेले त्याची परतफेड करण्यासाठी, राजकीय लोकांचे हस्तक न होता मस्तक ठिकाणावर ठेवून मोर्चात सहभागी होण्यासाठी,चांगल्या चळवळी,क्रांती, मोर्चे टिकविण्यासाठी, चालवण्यासाठी संसर्गजन्य आजारावर मात करण्यासाठी उज्ज्वल भविष्यासाठी,मानवतावादी विचार रुजवण्यासाठी, बिकट वाटा पादाक्रांत करण्यासाठी, समाजसेवकांच्या विचारधारा मनामनात बिंबवण्यासाठी,लोकनेता होण्यासाठी,विविध संकटांना तोंड देण्यासाठी करावं लागणार आहे.ते करताना आम्हाला सजग राहावं लागणार आहे. लोकशाहीच्या मूल्याचे जतन करत,मतदान न विकता समाजभान ठेवण्याची जबाबदारी घेऊन आपण सज्ज राहिले पाहिले.

आपण जर मतदान विकले तर आपला सरकारवर अधिकार राहणार नाही म्हणून,'इथल्या धनदांडगे आणि जात दांडग्यांनी तुमच्या मताच्या बोली लावून तुम्हालाबाजारू,विकाऊ बनवले' आपण बाजारू बनायचे की नाही आपल्या हातात आहे.आपण जातीपाती मध्ये न अडकता लढा दिला पाहिजे.कारण,' जातिधर्माचे किडे तुमच्या डोक्यात मनामनात असे काही सोडले जातात कीतुम्ही आपोआप भ्रमिष्ट होता.'

माणसांच्या मनात तिरस्काराचे विष पेरले जात आहे.त्यासाठी आम्हाला आमच्या धडावर आमचेच डोके ठेवावे लागणार आहे. एकेकाळी हातात शस्त्र घेऊन लढावं लागत होतं, काळ बदलला. आज आम्हाला,'हाती शब्दांच्या मशाली घेऊनभेदीत चाला हे अवघं काळोखी जंगल अन् शोधत चला आपल्या आपणच आपल्यासाठी ... सर्वांसाठी या उजेडवाटा..' हातामध्ये शब्दांच्या मशाली घेऊन उजेडवाटा शोधत फिरायचे आहे. त्यासाठी सर्वांनी उच्चशिक्षीत झाले पाहिजे.या वाटा आम्हाला फार पूर्वी म्हणजे,'सूर्यच शिरावर घेऊनप्रज्ञासूर्याच्या दिशेनेनिघालेली क्रांतिज्योती अन् जिजाऊ सावित्रिची लेक यांनी चालून दाखविल्या आहेत.' आता त्यांचा क्रांतीचे बोट धरून सर्व आम्हालाच करावे लागणार आहे.यातून हुसे यांनी विद्रोह,हक्क, समता,स्वातंत्र्य,बंधुता, व्यवस्थेला नकार याचे भान, जागृती सर्वांना आणून देण्याचे काम केले. परिवर्तनवादी विचारधारा मनामनात निर्माण केली. सद्यस्थितीमध्ये माणूस माणसापासून दुरावत चाललेला आहे. आपलेच आपल्याला लुटत आहेत,त्रास देत आहेत. त्यासाठी आपल्याला,'हाती घ्यावा लागेल पुन्हा 'शेतकऱ्यांचा आसूड'आणि झोडपून काढावे लागेलइथल्या दलाली व्यवस्थेला'

असा हक्काचा आसूड देऊन स्वाभीमानाने उभे करणारी, क्रांतिकारी विचार रुजवणारी हुसे यांची कविता आहे. जेव्हा जेव्हा अन्याय,अत्याचार वाढतो तेव्हा तेव्हा त्याचा विध्वंस होतच असतो.यातून परिवर्तन घडून येणारच असते. म्हणून कवी म्हणतो, नव्या इतिहासाचे साक्षीदारहोण्यासाठी नव्यासंघर्षाचे भागीदार व्हा! उगीच रडत पडत मागे राहू नका.नंतर आपल्यालाही स्वाभीमानाने सांगता आले पाहिले. या परिवर्तनाचे योद्धे आम्हीही होतो.असे योद्धे निर्माण करणारी विचारधारा कवितेतून मनामनात रुजवली आहे. राजकारणामध्ये सगळेच वाईट असतात असेही नाही.काही समाजकार्याला राजकारणाची व राजकारणाला समाजकार्याची जोड देऊन राजकारण करतात.ते लोकनेते होतात,असेच लोकनेते गोपीनाथ मुंढे होते.त्यासाठी त्यांना'इथं 'लोक' ही महत्त्वाचे नि'मत' हीकेवळ नेता नाही फक्त लोकनेता होताआलं पाहिजे..'लोकांचाही विचार करावयाचा आहे आणि त्यांच्या मताचाही.पण अनेकांना लोकनेते होण्याची संधी मिळते त्यातली काही हुरळून जातात आणि काही जमिनीवर राहून काम करतात.जे जमिनीवर राहतात तेच लोकनेते होतात,असे लोकनेते गोपीनाथ मुंढे झाले त्याबद्दल कवी म्हणतात,'साहेब, आपलं कर्तृत्व, नेतृत्व आभाळाएवढंआपण शोषितांचे मुक्तिदाते आणि आधारखंड आहात.'असे दीनदलितांचे आधारवड असणारे नेतेही आमच्यात आहेत हे कवी स्वाभीमानाने सांगतात.कवी 'आता युद्ध अटळ आहे' या कवितासंग्रहातून प्रत्येकाच्या हातात कविता रुपी शब्दाचे शस्त्र सोपवतात.'तुमच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचंनवं क्रांतिकारी शास्त्र आहे त्यासाठी आम्ही 'कविता'घेऊन निघालोय गाव गाड्याच्या वाटेने....'ते निघालेले आहेत. कारण आता आमचे युद्ध आमच्याशीच आहे. पारतंत्र्यामध्ये सुध्दा अनेक साहित्यिकांनी, इंग्रजांच्या विरुद्धचा लढा धगधगता करण्यासाठी शब्दरूपी शस्त्र हातात देऊन क्रांतीचे स्फूलिंग जनमानसात पेटवले होते.अगदी तसेच स्फूलिंग पेटवण्याचे कार्य हुसे यांची कविता करते. प्रत्येक काळ हा युद्धाचा असतो. फक्त युद्धामध्ये त्या त्या काळानुसार उतरावे लागते. आजच्या काळातले युद्ध शब्दाचे शस्त्र घेऊन करावे लागणार आहे. कारण डॉ.बाबासाहेब आंबेडकर,महात्मा फुले सावित्रीबाई फुले,छत्रपती शाहू महाराज आदिंनी आम्हाला त्यांच्या कार्यातून खूप मोठ्या प्रेरणा दिलेल्या आहेत.त्याच प्रेरणा मनामनात निर्माण करण्याचे,त्या विचारधारने मार्गक्रमण करण्याचे बळ हुसे यांची कविता करते. अतिशय मार्मिक, स्फूलिंग पेटवणारा, वैचारिक मंथन करणारा,विचाराला आचाराची जोड देणारा कवितासंग्रह म्हणजे'आता युद्ध अटळ आहे' होय. वाचक त्याचे स्वागत करतील हा आशावाद बाळगतो व शिवाजी हुसे यांना पुढील लेखनासाठी शुभेच्छा देतो.

**समीक्षक डॉ.नरसिंग अप्पासाहेब कदम**
**सदस्य,**
**मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ**
**महाराष्ट्र राज्य,मुंबई**
**तथा प्रोफेसर छत्रपती शिवाजीराजे**
**महाविद्यालय,**
**उदगीर जिल्हा लातूर.९४०४७३१०१०**

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002